**प्रेसनोट** **दिनांक १४/०५/२०२५**

**<u>ठाणे — ग्रामपंचायत, खर्डी ता. शहापुर, जि. ठाणे येथील उपसरपंच यांना सापळा कारवाई दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतले बाबत.</u>**

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | :- | ठाणे |
| **स्टेशन डायरी नोद क्रमांक** | :- | शहापुर पोलीस ठाणे, ठाणे ग्रामिण येथे स्टेशन डायरी क्र. ०२६/२०२५, वेळ १६:०६, दि. १४/०५/२०२५ |
| **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | :- | इतर लोकसेवक मोसिम मुर्तुजा शेख, वय— ३७ वर्षे, पद— उप सरपंच, खर्डी ग्रामपंचायत, ता. शहापुर जि. ठाणे राहणार— घर नं १४३, खर्डी बीट पोलीस चौकीचे पुढे, हायवे/फाऊंटन हॉटेल जवळ, मुंबई—नाशिक हायवे, खर्डी, ता—शहापुर, जि. ठाणे |
| **मागितलेली लाचेची रक्कम** | :- | ३०,०००/— रूपये |
| **स्विकारली लाचेची रक्कम** | :- | ३०,०००/— रुपये |
| **थोडक्यात हकीकत** | :- | यातील तक्रारदार यांनी खर्डी, ता. शहापुर, जि. ठाणे येथे घर खरेदी केलेले असुन सदर खरेदी केलेल्या घराची घरपट्टी त्यांचे नावे करून देण्याकरीता इतर लोकसेवक मोसिम मुर्तुजा शेख, वय— ३७ वर्षे, पद— उप सरपंच, खर्डी ग्रामपंचायत, ता. शहापुर जि. ठाणे हे तक्रारदार यांचेकडे ३०,०००/— रु. लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याने यातील तक्रारदार यांनी इतर लोकसेवक मोसिम मुर्तुजा शेख यांचे विरूध्द कारवाई करण्याकरिता अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. १३/०५/२०२५ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि. १४/०५/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये यातील इतर लोकसेवक मोसिम मुर्तुजा शेख यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे खरेदी केलेल्या घराची घरपट्टी तक्रारदार यांचे नावे करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/— रुपये लाचेची मागणी केली. त्याअनुषंगाने दि. १४/०५/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये यातील इतर लोकसेवक मोसिम मुर्तुजा शेख यांना तक्रारदार यांचेकडून ३०,०००/— रु लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आलेले असून पुढील कारवाई सुरु आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी — १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता — लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ— acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन — acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर— १०६४
दुरध्वनी क्रमांक — ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसॲप्स् क्रमांक — ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे
सत्यमेव जयते

( सचिन मोरे )
पोलीस निरीक्षक,
अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे